# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – ०९ ऑक्टोबर २०१५

मुंबई विद्यापीठाच्या महात्मा गांधी पीस सेंटरच्या वतीने 'पीस स्टडीज' या सहा महिन्याच्या शॉर्ट टर्म कोर्सेससाठी इच्छूक विद्यार्थ्यांकडून प्रवेशअर्ज मागविण्यात येत आहेत.अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर २०१५ असून या अभ्यासक्रमाचे वर्ग शनिवारी आयोजित केले जाणार आहेत.
२१ व्या शतकातील युध्द ,दहशतवाद,पर्यावरण –हास या अशा जागतिक समस्या आणि आव्हानाना ओळखून त्यावर लक्ष केंद्र करुन व्यावहारिक आणि धोरणनिश्चिती, वादविवाद, जागतिक शांतता आणि आणि सुरक्षिततेच्या आव्हानाना तोंड देण्यासाठी, सामाजिक मुल्य जपण्यासाठी,जगभरातील संघर्षावर लक्ष केंद्रीत करुन पीस स्टडीजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकण्याची ही मोठी संधी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सामाजिक न्याय,मानवी हक्क,आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुरक्षा आणि शाश्वत विकास या अशा महत्वपूर्ण घटकांचा अभ्यास याद्वारे विद्यार्थ्यांना करता येणार आहे.
पीस स्टडीज अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून सैध्दांतिक आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समाजमनाला भेडसावणा-या जागतिक समस्या आणि अहिंसा तत्वाचा पुरस्कार करुन या समस्यांच्या निराकरण करण्यावर भर दिला जात आहे.महात्मा गांधी यांच्या शांतता आणि अहिंसेच्या तत्वानुसार सामाजिक न्यायाची मांडणी करण्यासाठी या अभ्यासक्रमाची उपयुक्तता महत्वाची ठरते.

**अभ्यासक्रमाची उद्दिष्ट्ये-**

१) सैध्दांतिक दृष्टिकोनातून पीस स्टडीज समजून घेणे
२) मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून शांततेचे ध्येय,उद्दीष्ट्ये ,व्याप्ती आणि गरज अधोरेखित करणे
३) पीस एज्युकेशनचा अर्थ,गरज,ध्येय व उद्दीष्ट्ये आणि व्याप्ती समजून घेणे
४) निरोगी समाज आणि सुदृढ राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेतील पीस स्टडीजचे महत्व अधोरेखित करणे
५) बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक राज्यात शांतता प्रस्थापित करण्याची प्रक्रिया सुलभ करणे व त्याचा अभ्यास करुन सामाजिक न्यायाची निर्मिती करणे.

अशा वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमासाठी समाजातील विविध घटाकातील ,क्षेत्रातील नामवंत आणि सुप्रसिध्द तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करुन दिली जाणार असून यामध्ये पोलीस,न्यायमूर्ती,शिक्षणतज्ज्ञ,परराष्ट्र व्यवहारातील तज्ज्ञ,समाजशास्त्रज्ञ,मानसशास्त्रज्ञ,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार इत्यादी मंडळीकडून मार्गदर्शन लाभणार आहे.
इच्छूक विद्यार्थ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा-

*महात्मा गांधी पीस सेंटर,उपयोजित मानसशास्त्र विभाग,सी.डी.देशमुख भवन,विद्यानगरी कँपस,मुंबई-९८,फोन-022-26527764,26543282,26543064,9773476055*

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)